प्रलयः—प्रलय तरी काय एक प्रकारचा आहे? एकाचे नांव नित्य प्रलय, दुसरा दैनंदिन, तिसरा कर्मजन्यप्रलय. या सर्वांहून थोर म्हणजे ब्रह्मप्रलय. या प्रळयात संसाराचा मागमूसही राहत नाहीं. असे जरी आहे तरी ' कल्पादौ विसृजाम्यहम् ' हें शिवाय आहेच. ब्रह्मप्रलय झाला कीं सृष्टि सपली. हे जरी खरे आहे तरी सृष्टीचा समूळ ऱ्हास होत नाहीं. तिचा अगदीं निःशेष नाश झाला असे मात्र होत नाहीं, तर अविद्येच्या पोटीं वासना बीज-विलास अत्यंत सूक्ष्मरूपानें असतोच. याला उदाहरणः--पर्जन्यकाळीं नाना-तऱ्हेचीं तृणे पृथ्वीवर उगवतात व वाढतात, तींच शरत्काळीं पूर्णत्वास येतात, आणि उष्ण काळांत तींच बीजरूपानें पृथ्वींत विलीन होऊन असतात. व कोणास व्यक्तरूपाने दिसत नाहींत. त्याचप्रमाणे ब्रह्मप्रलयातीं वासना बीज-रूपाने संसार हा अव्यक्तात सुलीन असतो.

**सद्गुरुकृपादृष्टिः**—वर परमात्म्याचें ईक्षणाचे म्हणजे कृपावलोकनाचें महात्म्य वर्णन केलेंच आहे. तें जगाच्या व ब्रह्मांडाच्या स्थित्यंतरास जसें लागून आहे तसेच पिंडीं तेच ब्रम्हांडीं या न्यायानें साधकास जरूर ते ईक्षण त्याचेंच-नाव पूर्ण सद्गुरुकृपादृष्टि. ती नसेल तर पिंडवासी जीवाचे ठायीं ब्रह्मज्ञानाचा प्रकाश पडणारच नाहीं.

**संसाराभावः**—आणि या ज्ञानाचा पूर्ण प्रकाश पडल्याची खूण म्हणजे संसाराचा किंवा मी—तूंपणाचा पूर्ण अभाव. ती स्थिति लाभल्यावर पुढे प्रपंच मिथ्याभूत होतो. ध्रुवमंडळांत किंवा वैकुंठांत वास करण्याची महत्वाकांक्षा रहात नाहीं. तेथें देवभक्त भजन नाहीं, सायुज्यतेचें भान नाहीं, अत्यंत प्रलयाची स्थिति ती ही. हिलाच परमनिर्वाण गति म्हणतात.

देह पडला कीं हा प्रलय घडला असा कांहींचा कुतर्क आहे. जीवांत जीव असतांनाच ज्याला हा प्राप्त होईल व ज्यांच्या संसारबीजाचें दहन

होईल तोच भाग्याचा व तोच सद्गुरूचा खरा बच्चा. ज्याची संपूर्ण अहंममता खुंटेल व निःशेष कल्पना तुटेल त्यालाच ही निजात्मता प्राप्त होईल.

उत्पत्तीचा जसा उपक्रम आहे तसाच प्रळयालाही अनुक्रम आहे.

परमात्म्याचे कृपावलोकनापासून होणारे अनुग्रहाचें वर अल्प वर्णन आलेच आहे.

**परमात्म्याचे प्रळयदृष्टीचे परिणाम:**—त्याचे उलट परमात्म्याचे प्रलय-दृष्टीचे परिणामही मोठे विचार करण्यासारखे आहेत. या दृष्टीचा तडाका सुरू झाला कीं आरंभीं अनावृष्टि. प्राण हा अन्नमय आहे आणि अनावृष्टीचे शस्त्र सुटलें कीं सृष्टीवर अन्नान्नदशेला सुरवात झालीच. परमात्म्याचें दुसरें खडतर शस्त्र म्हणजे सांप्रतच्या या एक आदित्याप्रमाणे द्वादशादित्यांचा उदय होणें. तसे झाल्यावर झाडपान किंवा गवताची काडीही पृथ्वीवर दिसणे शक्य नाहा. इतकेच नाहीं तर त्या प्रखर तपापुढें पृथ्वीवरील पर्वत शिळाचे पीठ होऊन त्यामुळें सप्तपाताळात हलकल्लोळ उडून जाऊन सर्व ब्रह्मांड जळून जाऊन पृथ्वी भस्म होईल. अशा वेळी पृथ्वीचे पृथ्वीपणही शिल्लक राहणार नाहीं. नाहीं म्हणायला तिचे गंधमात्र स्वरूप मागे राहील.

**प्रलयमेघ:**—एकदा का हत्तीचे सोंडेसारख्या जलधारा सुरू झाल्या कीं सात समुद्र एकच होऊन जातात व गंधरूपाने उरलेले पृथ्वीचें रूप या जलात विरून जाते.

**प्रलयाग्नि:**—त्यापुढें मग प्रलयाग्नि उत्पन्न होऊन तो जलाचें शोषण करतो व रसमात्र अवशेष राहतो. तोही तेजाचे ठिकाणीं लय पावतो आणि मग दाही दिशा तेजानें दुमदुमून भरून जातात.

**झंजा मारुतः**—व त्यानंतर झंजा मारुत म्हणजे भयंकर सोसा-ट्याचा वारा सुटून तेजाला शोषून टाकतो व जिकडे तिकडे वायूच वायू होऊन जातो.त्या वायूला आकाश गिळून टाकतें व त्या वेळीं वायू फक्त स्पर्श-रुपाने अवशेष राहतो व तोही आकाशांत लय पावतो.

**आकाशः**—तें आकाशही शब्दांत लीन होऊन शब्द तन्मात्र बाकी रहाते.

**सत्वः**—विकार पावलेला जो सत्वगुण असतो त्याच्यापासून देवता व अंतःकरण हीं उत्पन्न होतात. हा सत्त्वगुणही प्रलयाच्या स्वभावधर्माप्रमाणें मनामध्यें प्रवेश करतो.

**मनः**—जीवपण आणि शिवपण या मनाच्याच कल्पना आहेत. ज्या सत्वगुणापासून मनोदेवता व अंतःकरण उत्पन्न होतात त्यांतच हीं दोन्हीं लीन होतात. शब्दतन्मात्र हें तामसाशीं एकरूप होतें.

**अहंकारः**—अहंकार हा तीन गुणांनीं बनलेला आहे.

**महत्तत्वः**—महत्तत्वकारण गुणात लीन होतें, व गुणसाम्य हें अव्यक्तांत लीन होते.

**अव्यक्त**—सर्व आकारविकार नाहींसे होऊन बीज मात्र ज्या स्थितींत अवशेष राहतें त्या स्थितीला अव्यक्त ही संज्ञा आहे. ज्याच्या छायेला हजार लोक आश्रय करितात तो अवाढव्य वटवृक्ष कोणीकडे व जें दृष्टीला चांगलेसे दिसतही नाहीं एवढें सूक्ष्म वटबीज कोणीकडे, तीच स्थिति भवबीज जे अव्यक्त त्याची आहे.

**व्यक्तः**—हे भवबीज काळाशीं एकरूप होतें. म्हणजे काळात त्याचा लय होतो व योग्य काळानुसार पुन्हा क्षुब्ध होऊन जगद्रूपानें व्यक्त स्थितीस येते.

आणि या काळाचा लय पुरुषांत होतो.

**काळः**—पुरुषाची जी पूर्ण क्षुब्धावस्था तिचेंच नांव काळ. व उत्पत्ति स्थिति व प्रलय या तिन्ही अवस्था काळाच्या आहेत. या सपल्या म्हणजे काळाचे काम राहिले नाहीं. म्हणून तो स्वाभाविकपणेच जीवामध्ये एकरूप होतो.

**जीव** अचेतनाला चेतवतो, जडाला जीववतो म्हणूनच पुरुषाला जीव असें म्हणतात. प्रकृतिमुळेंच शुद्धाला जीव असें म्हणतात व तोच पुरुष.

**प्रकृतिः**—प्रकृति म्हणजे काय याचा जर विचार केला तर तिचें मृगजळाशीं अगदीं साम्य आहे. मृगजळ हें दिसतें पण त्यांत सत्यता कांहीं नसते.

**जीवाचा परब्रह्मांत लयः**—जीवाला आत्मस्वरूपाची आठवण होणें ह्याचेंच नांव जीवाचा परब्रह्मांत लय.

**परमात्माः**—हा अज, अव्यय, अविनाश, अद्वय व अनन्त आहे. व तेंच रामकृष्णादि अवतारी पुरुषांचे स्वरूप आहे. जलामध्ये आकाश बुडाल्यासारखे दिसतें, पण तो केवळ भ्रम आहे. शुद्ध दर्पणामध्यें आपण पाहूं जातां हुबेहूब आपणच त्यांत आपणाला दिसतों. ब्रह्माच्या ठिकाणीं ब्रह्मपण स्फुरत नाहीं. मग तेथें मी—तूंपण कुठलें? परिपूर्ण जो परमानंद तोच राम-तोच कृष्ण.

**अहंभावः**—अहंभावाचे योगानें संसार वाढतो. म्हणून अहंकार सोडला पाहिजे.

**मनुष्यजन्मः**—संसारात अनेक योनींत जन्म येत असतो. त्या सर्वांत मनुष्ययोनींत जन्म येणे हे उत्तम. मनुष्य जन्मास येऊन सर्व गात्रें जेथल्या तेथे अव्यंगपणे असणें हे महद्भाग्य. त्यातही स्त्रीदेहापेक्षा पुरुषदेहीं जन्मास येणे हे त्याहून अधिक भाग्य. त्यातही विवेक संपन्नता, वेदशास्त्रज्ञता आणि मुमुक्षुता ही अंगीं असून सर्वात अधिक असे जे ईश्वराचे भजन त्याबद्दलही आवड असावी व इतकेही असून तो ईश्वरपदीं अनन्य शरण झाला पाहिजे म्हणजेच तो ईश्वराचे पूर्ण कृपेस पात्र होतो. मग त्याला ज्ञान प्राप्त होते. इतक्या महत्त्वाच्या अशा या फक्त नरजन्मात ब्रह्मज्ञानाचा लाभ घडतो. तरी या जन्मास येऊन जो सत्कर्माचरण करणार नाहीं व केवळ वैषयिक सुखाचे मागे लागून धर्माधर्माकडे लक्ष देणार नाहीं त्याचे जिणे निंद्य होय. नरदेहास येऊन देहाभिमान सोडून परमेश्वराचे अनन्य भजन केल्याने सत्व गुणाची वृद्धि होते व तेणेकरून सविवेक ज्ञानोत्पत्ति होते आणि ही विवेकज्ञानाची वृत्ति ठरली कीं शोधितसत्व स्थिति प्राप्त होऊन अभेद भक्तीला उल्हास येतो.

**निरपेक्ष भक्तिः**—निरपेक्ष भक्ति व तिचेपासून अनिवार सत्वशुद्धि घडल्यावाचून सर्वभूतीं भगवद्भाव व पूर्ण ब्रह्मप्राप्ति होणे नाहीं. अशी निरपेक्ष भक्ति आणि ती मोठ्या प्रीतीने घडता घडतां अत्यंत सत्वशुद्धि व भूतीं भगवंत ही बुद्धि उत्पन्न होऊन रज, तम हे समूळ नाश पावून शुद्ध सत्वाला स्फुरण येते. व साधक स्वानंदपूर्ण होऊन जातो. आपली आपल्यास धन्यता वाटते. पण हे सुखाचें जे स्फुरण होते तीही मायाच. हा सत्वगुणही नाहींसा होऊन स्वस्वरूपात विरून गेला पाहिजे. असे तिन्ही गुण निःशेष नाहींसे झाले म्हणजे निजनिर्गुणस्थिति प्राप्त होते.

**वैराग्यः**—जेव्हां वैराग्य वाढीस लागेल तेव्हा सद्गुरूची कृपा होऊं लागली असे समजावे. आणि ते जेव्हा पूर्ण होईल तेव्हा सद्गुरुकृपा पूर्ण झाली असें समजावे.

**जीवब्रह्मैक्यः**—जीव हा सहजच ब्रह्म आहे. तो मायेच्या गुणामुळें जीवत्वाला येऊन पोहचला आहे. उदाहरण, राजा उत्तम शय्येवर पहुडला आहे आणि स्वप्नांत आपण भीक मागत आहे व दारोदार दैन्य भाकत आहे व स्वप्नातच त्या भूमिकेवरून चाळवत असता त्याचे सेवक त्याला थापटून जागे करीत आहेत. जागा झाल्यावर पाहतो तर आपण पूर्ववत् आपले रत्नजडित पलंगावरच पहुडलेले आहो.

याचप्रमाणें वैराग्यानें त्रिगुण झाडलें कीं जीवच ब्रह्म आहे.

**भागवत धर्मः**—भागवत धर्मानुसार जर भक्ति केली तर चित्तवृत्ति निर्मळ होते व जीव तोच ब्रह्म अशी शुद्ध स्फूर्ति ठसते आणि मग स्वानंदप्राप्ति होऊन त्याच्या पुढील जो परमानंद त्यात जीव विलीन होतो.

**त्रिगुण मायाः**—त्रिगुणाची उत्पत्ति अनादि मायेपासून आहे. पाच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रिये व पांच विषय आणि मन मिळून १६ काळाचा जो वासनात्मक लिंगदेह त्याचेमुळे जीव सुखदुःखें भोगीत असतो.

वंध्या पुत्राचा विस्तार आणि जीवाचा संसार यांत कांहीं फरक नाहीं. हा संसार देहाभिमानाने फारच वाढत जातो. परंतु सुदैवानें गुरुवाक्यावर विश्वास बसला व ज्ञानानुभवाचा योग आला तर सूर्योदयीं अंधारासह जसा रात्रीचा तसा मायेचा अगदी बेपत्ता होऊन जातो.

**जीवन्मुक्तस्थितिः**—सारांश गुणविकार नाश पावल्यावर देही जीवन्मुक्त होतो. मात्र कुंभाराने आपलें चाकाला एकदां वेग दिल्यामुळें त्यावर

त्याचे मडके घडून निघालें तरी पुढेही बराच काल ते चाक जसे फिरत राहते, तसे प्रारब्ध संपेपर्यंत पुढेही ज्ञाते आपले भोग भोगीत राहतात. पण ते देहाहंकृतिविरहित राहतात आणि प्रारब्धवशांत ते जरी विषयांत लोळत पडले तरी त्याची वृत्ति विकारांनीं यकिंचितही विटाळली जात नाहीं. ज्ञात्याचे ठिकाणीं विषयांचे दर्शन ही वार्ताही मिथ्या आहे. ओंजळीनें मृगजळाचे प्राशन करणाराचे हात पाण्याने ओले होण्याचा जेवढा संभव अथवा गगनकमळांचा आमोद भ्रमराने घेण्याचा जेवढा संभव तेवढाच सज्ञानाला विषयसंबंधाचा बाध होण्याचा संभव असतो.

मुमुक्षू—पण ही मुक्तांची अतर्क्य स्थिति झाली. मुमुक्षूला हिचा काय उपयोग ? म्हणून मुमुक्षूकरितां भागवतांत श्रीकृष्ण परमात्म्याने उद्धवासाठीं किंबहुना सर्व मुमुक्षूसाठीं मोठ्या प्रेमाने व कळकळीनें काहीं नियम घालून दिलेले आहेत त्याप्रमाणे वागणाराचे कल्याणच होईल.

त्यांतील मुख्य नियम हा कीं,आपले कल्याणाची इच्छा करणाराने केवळ शिश्नोदरपरायण राहून आणि स्वधर्माचा त्याग करून अधर्माच्या ठायीं रत झालेल्या विषयासक्त अशा असाधु व दुर्जनाची संगत कोणत्याही प्रसंगीं करूं नये. त्याच्यापासून नेहमीं ४ पावले दूर असावें.

चांगली गाई ओढाळ गाईचे संगतींत एक क्षणभर जरी गेली तरी तेवढया एका क्षणासाठींसुद्धा तिच्या गळ्यांत निरंतरचें लोढणे अटकून पडले जातें.

कुसंगः—कुसंगापासून नरकपात होतो व तेथें सुदैवानें जर अनुताप झाला तरच त्याची सोडवण.

अनुतापः—अनुतापसुद्धा ईश्वरकृपेवांचून होत नाहीं.

मनुष्याने आपले कल्याणासाठीं सत्संग जोडावा आणि दुस्संग सोडावा असे साधुसंत सांगत आले आहेत. त्यांच्या मतें स्त्री आणि स्त्रैण यांच्यासारखा बलवत्तर दुःसंग दुसरा कोणताच नाहीं. जो वेदशास्त्रार्थ मानीत नाहीं, परमार्थासंबंधीं ज्याचे मन साशंक व ज्याचे मन नेहमीं विकल्पानें भरलेले तोही दुःसंगच. तोंडानें एकाद्या पूर्ण विरक्तासारखें जो बोलतो, पण ज्याचें वर्तन पाहू जातां शुद्ध धर्मबाह्य मनुष्याप्रमाणें असतें व ज्याचे काम-प्रवाहास यत्किंचित् विरोध झाला असता ज्याचे अंतरीं द्वेष उत्पन्न होतो तोही दुःसंग. बाहेरून स्वधर्मकर्मांत मोठ्या निष्ठेचा व सात्विकपणाचा आव घालून आतून साधुसंतांचे दोष पाहत राहणे यासारखा भयंकर दुःसंगच नाहीं. तोंडानें काहीं बोलावयाचें नाहीं, पण मनानें साधुसंतांचे गुणदोष पाहत रहावयाचे हा महाकठीण दुःसंग. मुख्यत्वेंकरून आपली जी सकामवृत्ति असते ताही दुःसंगच आहे. हा दुःसंग ज्याचा सुटला त्याचा संसार सुखरूप झालाच म्हणून समजावे. मग हा दुःसंग सुटावा कसा ? सत्संग मिळाल्या-वाचून दुःसंग सुटणे नाहीं. साधुसंतांचे पाय धरल्याशिवाय या दुःसंगांतून सुटका होणे कठीण. मात्र हे संत ओळखावे कसे ? हा एक मोठा प्रश्न आहे. संत कोण व असंत कोण हे ओळखता आले पाहिजे. हें कसें ओळखावयाचे याचे निरूपण पुढे होईल.

बाबांचा हेमाड

# अध्याय ४९ वा

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।

श्रीकुलदेवतायै नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।

॥ श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ॥

सांगोपांग सद्गुरु स्तवनें । ठकले वेद आणि पुराणें ॥
तेथें मी अजाण नेणतपणें । बरें राहणें निवांत ॥ १ ॥
खरें पाहतां धरावें मौन । हेंच कीं वस्तुतः सद्गुरुस्तवन ॥
परी साईचे एकेक गुण । पाडिती विस्मरण मौनाचें ॥ २ ॥
धन्य साईची अगाध लीळा । पाहतां निवांत राहवे न मजला ॥
पक्वान्न गोड लागतां जिव्हेला । मनीं आठवला श्रोतृवृंद ॥ ३ ॥
तयांसीही पंक्तीस घ्यावें । जेणें निज रसानंद दुणावे ॥
ऐसें माझिया घेतलें जीवें । तेणेंही रससोये[1] निडारली[2] ॥ ४ ॥
मोठें गोड खरें पक्वान्न । पंक्तीं नसतां स्नेही सज्जन ॥
नावडे तें एकट्या लागून । फिकें गोडपण तयाचें ॥ ५ ॥
साई सकळ अवाप्तकाम[3] । साई सकल संतललाम ॥
साई निजभक्त विश्रामधाम । दुर्धर भवभ्रमनिवारक ॥ ६ ॥
अनिर्वाच्य तयाची लीळा । वर्णवेना मम वाणीला ॥
अतर्क्याची अतर्क्य कला । केवी मजला आकळेल ॥ ७ ॥

---

१ भोजन. २ रंगांत आली. ३ ज्याच्या सकल इच्छा परिपूर्ण झाल्या आहेत असा.

कल्याणाचें जें कल्याण। तो हा साई निजरूपें जाण ॥
देइ निजकथेचें स्मरण। ग्रन्थ हा परिपूर्ण करावया ॥ ८ ॥
गावूं जातां अगाध महिमान। समर्थ कोण कराया कथन ॥
परा जेथें निघे परतोन। पश्यंती मध्यमा कोण कथा ॥ ९ ॥
तिघी जेथें नुघडती वदन। चौथी वैखरी तेथें कोण ॥
हें मी जाणें जरी संपूर्ण। तरी हें मन राहीना ॥ १० ॥
सद्गुरूचे पायीं न विनटतां। यथार्थ स्वरूप येईना हाता ॥
संत श्रीहरिस्वरूप स्वतः। कृपाहस्ता प्रार्थावें ॥ ११ ॥
गुरूचरणाची आवडी। हेचि आपुली सर्वस्व जोडी ॥
संत सहवासाची गोडी। प्रेम परवडी लागो आम्हां ॥ १२ ॥
जया पूर्ण देहाभिमान। तया न साजे भक्ताभिधान ॥
स्वयें जो पूर्ण निरभिमान। खरें भक्तपण त्या अंगीं ॥ १३ ॥
जया ज्ञातृत्वाचा ताठा। श्रेष्ठत्वाचा अभिमान लाठा ॥
केवळ दंभाचा जो वसवटा। तयाची प्रतिष्ठा ती काय ॥ १४ ॥
आपुलाल्या गुरूची कीर्ति। अभागी जे प्रेमें न गाती ॥
बधिर नसुनी जे नायकती। ते मंदमती मूर्तिमंत ॥ १५ ॥
तीर्थव्रत यज्ञदान। यांहून थोर तपाचरण ॥
त्यांहून अधिक हरिभजन। निजगुरुध्यान सर्वाधिक ॥ १६ ॥
साईच त्याचिया भक्तांचें ध्यान। साईच त्यांचें देवदेवतार्चन ॥
साईच त्यांचें गुप्तनिधान। रक्षावे परी अकृपणत्वें ॥ १७ ॥
यदा कदा येई मज आळस। परी न अंतर्यामी साईस ॥
विसर पडतां कथानकास। देई मज वेळेस आठवण ॥ १८ ॥

बसूं म्हणतां क्षण निवांत । माझें कांहीं न चले तेथ ॥
कथा ऐसी स्फुरे अकल्पित । लेखणी हातांत घेणें पडे ॥ १९ ॥
ऐसिया त्याच्या अगाध कथा । ऐकवावया त्या निजभक्तां ॥
आणिक माझिया निजस्वार्था । मज या सच्चरिता प्रवर्तविलें ॥ २० ॥
नाहीं तरी संतांचिया कथा । ज्याचा तोच रचिता लिहिता ॥
तयाची ती स्फूर्ती नसतां । केवळ नीरसतां पदोपदीं ॥ २१ ॥
असो कृपाळू साईनाथ । प्रवेशूनि मन्मना आंत ॥
करवूनि घेतला आपुला ग्रंथ । माझेही मनोरथ पुरवीले ॥ २२ ॥
मुखीं श्रीसाईनामावर्तन । चित्तीं तयाचें वचन चिंतन ॥
मनीं तयाचे मूर्तीचे ध्यान । पूर्ण समाधान येणें मज ॥ २३ ॥
वदनीं श्रीसाईचें नाम । अंतरीं श्रीसाईचे प्रेम ॥
ज्याचें साई प्रीत्यर्थ कर्म । ऋणाइत परम त्या साई ॥ २४ ॥
तुटावया संसारबंधन । याहून नाहीं अन्य साधन ॥
साईकथा परम पावन । सदासेवन सुखदाई ॥ २५ ॥
पायीं साईसीं प्रदक्षिण । करा श्रवणीं सच्चरीतश्रवण ॥
सर्वांगीं द्या प्रेमालिंगन । डोळां घ्या दर्शन साईचे ॥ २६
साष्टांगीं यावें लोटांगणीं । मस्तक ठेवावा तयां चरणीं ॥
जिव्हा लागावी तन्नामस्मरणीं । नासिकें अवघ्राणीं निर्माल्य ॥२७॥
आतां पूर्वकथानुसंधान । गताध्यायीं श्रोतयां लागून ॥
चमत्कार प्रिय भक्त कथा कथान । कथीन हें वचन दीधलें ॥ २८ ॥
स्वयें न स्वार्थ परमार्थ परायण । नसतां संतांचे अधिकाराची जाण ॥
केलिया कोणी तयांचे वर्णन । अविश्वासी मन जयाचें ॥ २९ ॥

स्नेही कथितां साईच्या गोष्टी । ऐके परी तो दोषैकदृष्टी ॥
तया न मिळतां स्वानुभवपुष्टी । कांहीं न सृष्टींत मानी तो ॥३०॥
हरी कानोबा नामाभिधान । स्नेह्यांसवें मुंबईहून ॥
करावया साईचें परीक्षण । निघाले पर्यटण करावया ॥ ३१ ॥
परी साईची कलाकुसरी । प्रकाशे जो सकळांतरीं ॥
ते लाघव ती नवल परी । कोण निर्धारीं जाणील ॥ ३२ ॥
हरीभाऊ शिरडीस निघतां । कारण कळलें साईसमर्था ॥
केवळ चमत्काराचा भोक्ता । तितुकीच पात्रता तयाची ॥ ३३ ॥
तितुकीच तया दावी चुणुक । घेइ अपुलासा करूनि निष्टंक ॥
तयाच्याही श्रमाचें सार्थक । युक्तिप्रयोजक संत खरे ॥ ३४ ॥
कोपरगावीं स्नेहीसमेत । हरीभाऊ बैसले टांग्यांत ॥
गोदावरींत होऊनि सुस्नात । निघाले शिर्डीप्रत अविलंबे ॥ ३५ ॥
येतांच कोपरगांवाहून । हस्तपाद प्रक्षाळून ॥
हरीभाऊ संतावलोकन । करावया जाण निघाले ॥ ३६ ॥
पायीं कोरें पादत्राण । माथां जरीचा फेटा बांधून ॥
साईबाबांचें घ्यावया दर्शन । उत्कंठित मन हरिभाऊ ॥ ३७ ॥
मग ते येतां मशीदीसी । दुरून देखूनियां साईंशी ॥
वाटलें संनिध जाऊनि त्यांसीं । लोटांगणेसीं वंदावें ॥ ३८ ॥
परी पादत्राणांची अडचण । ठेवावया न निर्भयस्थान ॥
तेथेंचि एक कोपरा पाहून । त्यांतचि तीं सारून ठेवियलीं ॥ ३९ ॥
मग ते वरती दर्शना गेले । प्रेमें साईचे चरणा वंदिले ॥
उदी प्रसाद घेऊन परतले । वाड्यांत निघाले जावया ॥ ४० ॥
पायीं घाल जातां पायतण । मिळेना पाहतां शोध शोधून ॥
परतले अनुवाणी खिन्न वदन । आशा ते सांडून समूळ ॥ ४१ ॥

कारण तेथें मंडळी फार । येतीजाती वारंवार ॥
पुसावें तरी कोणास साचार । कांहींही विचार सुचेना ॥ ४२ ॥

ऐसें तयाचें दुश्चित मन । डोळीयांपुढे पादत्राण ॥
चित्तास पादत्राण चिंतन । सर्वानुसंधान पादत्राण ॥ ४३ ॥

हांसे सारिखे विकत घेतलें । पादत्राण गेलें हरवले ॥
अर्थात कोणा चोरानें चोरिलें । निश्चयें वाटलें तयांस ॥ ४४ ॥

असो पुढें केलें स्नान । पूजा नैवेद्यादि सारून ॥
पंक्तीस बैसून केले भोजन । परी न समाधान चित्तास ॥ ४५ ॥

सभामंडप साईचे स्थान । तेथून साईची दृष्टी चुकवून ॥
कोणी न्यावें माझें पायतण । आश्चर्य व्हान हें काय ? ॥ ४६ ॥

लागली तयां हुरहुर । चित्त नाहीं अन्नपानावर ॥
मंडळी समवेत आले बाहेर । आंचवूं कर धुवावया ॥ ४७ ॥

इतक्यांत एक मुलगा मराठा । हरवल्या पादत्रणाची वाहुटा॥
लावूनि एका काठीचे शेवटा । पातला त्या ठाया अवचित ॥ ४८ ॥

मंडळी जेऊन आंचवीत । मुलगा आला शोध करीत ॥
म्हणे बाबा मज पाठवीत । काठी ही हातांत देउनी ॥ ४९ ॥

" हरी का बेटा जरीका फेटा " । ऐसा पुकार करीत जा बेटा ॥
"याच त्या माझ्या" ऐशिया उत्कंठा। झोंबेल त्या देऊन टाकाव्या॥

परी जो आहे हरीका बेटा । आहे तयाचा जरीचा फेटा ।
आधीं हें निश्चित झालिया शेवटा ।द्याव्या न बोभाटा करावा ॥५१॥

येतां ऐसा पुकार कानीं । ओळखोनि त्या वहाणा नयनीं ॥
हरीभाऊ गेले धांवूनि । साश्चर्य मनीं जाहले ॥ ५२ ॥

आनंदाश्रू आले डोळां । हरीभाऊस गहिंवर दाटला ॥
देखूनि गेलेल्या पायतणाला । चमत्कारला अत्यंत ॥ ५३ ॥
म्हणती मुलास ये ये इकडे । पाहूं दे आण वहाणा मजकडे ॥
पाहूनि वदेया तुज कोणीकडे । गिवसल्या रोकडें मज सांग ॥५४॥
मुलगा म्हणे ते मी नेणें । मजला बाबांची आज्ञा मानणें ॥
हरीका बेटा असल तणें । जरीचा फेटा दावणें मज ॥ ५५ ॥
तयासचि मी देईन वहाणा । मज इतराची ओळख पटेना ॥
पटवील जो या बाबांच्या खुणा । तोच या वहाणा घेईल ॥ ५६॥
"अरे पोरा त्या माझ्याच वहाणा" । हरिभाऊ म्हणतां देईना ॥
मग तो सकळ बाबांचिया खुणा । पटवी मना पोराच्या ॥ ५७ ॥
म्हणे पोरा मीच रे हरी । कान्होबाचा बेटाही वैखरी ॥
सर्वथैव आहे कीं खरी । मज सर्वतोपरी लागतसे ॥ ५८ ॥
आतां पाही फेटा जरीचा । फिटेल तुझे संशय मनाचा ॥
मग मी ठरेन धणी वहाणांचा । दावा न इतरांचा यावरी ॥ ५९ ॥
झाली तेव्हां मुलाची समजूत । वहाणा दिधल्या हरीभाऊप्रत ॥
पुरले तयाचे मनारथ । साई हे संत अनुभविले ॥ ६० ॥
आहे माझा फेटा जरी । ही काय मोठी नवलपरी ॥
तो तों माझिये मस्तकावरी । सर्वतोपरी दृश्यमान ॥ ६१ ॥
परी मी असतां देशांतरीं । शिर्डीस माझी पहिलीच फेरी ॥
साईबाबांस कैसियेपरी । मन्नाम हरी ठाऊक ॥ ६२ ॥
कान्होबा हा माझा पिता । कोणी पाहिला सवरला नसतां ॥
"का" या नामें तया उपलक्षितां । अति आश्चर्यता वाटली ॥६३॥
पूर्वी साईसंत महत्ता । माझे स्नेही मजला सांगतां ॥
अवमानिली मी त्यांची वार्ता । पश्चात्तापता आतां मज ॥ ६४ ॥

आतां मज येतां अनुभव । कळला साईबाबांचा प्रभाव ॥
उरला नाहीं संशया ठाव । महानुभाव श्रीसाई ॥ ६५ ॥
जया मनीं जैसा भाव । हरीभाऊस तैसाचि अनुभव ॥
संतपरीक्षण लालसास्वभाव । परमार्थ हाव नाहीं मनीं ॥ ६६ ॥
साई समर्थ महानुभाव । स्नेही सोयरे कथिती अनुभव ॥
आपण स्वयें पहावा नवलाव । शिरडीस जावया कारण हें ॥ ६७ ॥
संतचरणीं वहावा जीव । तेणें गिवसावा देवाचा ठाव ॥
मनीं नाहीं यत्किंचित डाव । सरड्याची धांव कोठवरी ॥ ६८ ॥
जाऊनियां संतांच्या दारा । पाहूं आदरिलें चमत्कारा ॥
तंव जोड पादत्राणाचा कोरा । आला कीं घरा घरपोंच ॥ ६९ ॥
नातरी क्षुल्लक पायतन । गेल्यानें काय मोठी नागवण ॥
परी तदर्थ मनाची वणवण । ते सांपडल्याविण राहेना ॥ ७० ॥
संत प्राप्तीचे मार्ग दोन । एक भक्ति दुजा ज्ञान ॥
ज्ञानमार्गींचे सायास गहन । भक्तिचें साधन सोपारें ॥ ७१ ॥
ऐसी सोपी सुलभ भक्ति । तरीही अवघे ती कां न करिती ॥
तिजलाही महत्भाग्य संपत्ति । असतांच तत्प्राप्ती घडतसे ॥ ७२ ॥
कोटि जन्मांचें पुण्य असते । तेव्हांचि संतांची गांठी पडते ॥
संतसमागम सौख्य घडतें । तेणेंच विकासतें निजभक्ति ॥ ७३ ॥
आम्ही सर्व जाणों प्रवृत्ति । तेथेंचि आसक्ति नेणों निवृत्ति ॥
ऐसी जेथें मनाची वृत्ति । ती काय भक्ति म्हणावी ॥ ७४ ॥
जैसी जैसी आमुची भक्ति । तैसी तैसी आम्हांस प्राप्ति ॥
हे तो केव्हांही घडणार निश्चिती । येथें न भ्रांती तिळमात्र ॥ ७५ ॥
विषयभोगार्थ अहर्निशीं । आम्ही जपलों साईपाशीं ॥
या आम्हांते देणगीही तैसी । परमार्थियासी परमार्थ ॥ ७६ ॥

असो आतां आणीक एक । सोमदेव स्वामी नामक ॥
कशावरा साईची पारख । पातले प्रत्यक्ष शिरडींत ॥ ७७ ॥
सन एकोणीसशे सहा । उत्तर काशीमाजी पहा ॥
गृहस्थ भेटला भाईजीसहा । पांथस्थ निवहामाजिस्थित ॥ ७८ ॥
प्रसिद्ध कैलासवासी दीक्षित । भाईजी त्यांचे बंधू विश्रुत ॥
बद्रिकेदार यात्रा करीत । असतां हे भेटत मार्गांत ॥ ७९ ॥
बद्रिकेदार मार्गे टाकिलें । भाइजी मग खालीं उतरले ॥
ठायीं ठायीं विसावे लागले । पांथस्थ दिसले वसलेले ॥ ८० ॥
तया माजील एक असामी । तेच हे पुढें हरीद्वाराचे स्वामी ॥
सर्वत्र विश्रुत याच नामीं । लागले लगामीं बाबांच्या ॥ ८१ ॥
त्यांची ही कथा बोधप्रद । बाबांचे स्वरूप करील विशद ॥
श्रवणकर्त्यां देईल मोद । निजानंद सर्वत्रां ॥ ८२ ॥
प्रातर्विधीस जातां भाइजी । भेटले मार्गी हे स्वामीजी ॥
गोष्टी बोलतां बोलतां सहजी । प्रेमराजी प्रकटली ॥ ८३ ॥
गंगोत्रीचा अधः प्रदेश । बुवा असतां उत्तर काशीस ॥
डेराडूनहून सत्तर कोस । तेथें हा सहवास जाहला ॥ ८४ ॥
लोटा घेऊन बहिर्दिशेस । निघाले बुवा प्रातः समयास ॥
भाईजीही तया स्थळास । त्याच कार्यास निघाले ॥ ८५ ॥
प्रथम उभयतः दृष्टादृष्टी । पुढें मार्गांत परस्पर भेटी ॥
परस्परांच्या कुशल गोष्टी । सुख संतुष्टी चालल्या ॥ ८६ ॥
करूं लागतां विचार पूस । प्रेम आलें परस्परांस ॥
ठाव ठिकाणा एकमेकास । पुसावयास लागले ॥ ८७ ॥
हरिद्वारीं तुमचा वास । नागपूरीं अम्हा निवास ॥
कधीं जेव्हां त्यावाजूस । येणें झालियास दर्शन द्या ॥ ८८ ॥
यात्रा करीत याल जेव्हां । पुनीत करावें आमुचें गेहा ॥

पुनर्दर्शन अम्हा घडवा । अल्प सेवा घ्या अमुची ॥ ८९ ॥
असं घावे आमुचें स्मरण । लागावे अमुचे घरास चरण ॥
हेंच अमुचे आहे विनवण । पुरवो नारायण ही इच्छा ॥ ९० ॥
एकोणीससें सहा सालीं । उत्तर काशीचिया खालीं ॥
परस्परांत हे भाषा बोली । होऊनि गेली इयापरी ॥ ९१ ॥
परस्परांचें ठाव ठिकाण । घेतले उभयतांही पुसून
पाहून जवळ आले मैदान । निघाले सोडून अन्योन्या ॥ ९२ ॥
जातां पांच वर्षांचा काळ । येतां साईसमागम वेळ ॥
भाईजीच्या भेटीची तळमळ । लागली मवळ स्वामीस ॥ ९३ ॥
सन एकोणीससें अकरा । आले स्वामीजी नागपूरा ॥
तेथे श्रीसाईनाथांचे चरित्रा । परिसतां पवित्रा आनंदले ॥ ९४ ॥
देती भाईजी शिफारस पत्र । सुखें गाठावें शिर्डीक्षेत्र ॥
ऐसी योजना ठरवूनि सर्वत्र । सोडिलें नागपुर स्वामींनीं ॥ ९५ ॥
उतरतां ते मनमाडावर । कोपरगांवची गाडी तयार ॥
तेथे होऊनि टांग्यांत स्वार । आनंद निर्भर दर्शना ॥ ९६ ॥
कोठेंही जा साधूचें वर्तन । अथवा त्यांची रहाणी चलन ॥
एकाचें एक एकाचे आन । नसतें समसमान कोठेंही ॥ ९७ ॥
एका संताचें आचरण । तें न दुजिया संता प्रमाण ॥
योग्यायोग्यतेचें अनुमान । कराया साधन हें नव्हे ॥ ९८ ॥
आधीं जो जाई संतदर्शना । किमर्थ व्हावी हे तया विवंचना ॥
पाहूं जातां तयांचे वर्तना । निज कल्याणा नागवण ॥ ९९ ॥
स्वामीजीचे मनाची रचना । तर्क कुतर्क उठती नाना ॥
लांबून दिसतां शिर्डीच्या निशाणा । चालल्या कल्पना स्वामीच्या ॥ १०० ॥
तयांसवे असलेले जन । मशीदीचे कळसाचें निशाण ॥
दृष्टिपथांत येतां दुरून । करीत वंदन प्रेमानें ॥ १०१ ॥

पुढे घडेल साई दर्शन । म्हणोनि जरी उत्कंठित मन ॥
परी न त्यांते दिसलेले निशाण । त्याचाही अवमान साहेना ॥ १०२ ॥
निशाणदर्शनें प्रेमस्फुरण । हा तो सर्वत्र अनुभव जाण ॥
हे तों भक्ति प्रेमलक्षण । कांहींही विलक्षण येथ नसे ॥ १०३ ॥
परी स्वामीच्या कुत्सितमना । दुरून पाहूनियां त्या निशाणा ॥
उठल्या कल्पनावरी कल्पना । विचित्र रचना मनाची ॥ १०४ ॥
पताकांची आवड मना । ही काय साधुत्वाची कल्पना ॥
देउळावरी लावावें निशाणा । हा तो हीनपणा साधुत्वा ॥ १०५ ॥
साधू मागे ऐणें माना । ही तो त्याची केवळ लोकेषणा ॥
येईन ऐशियाचें साधुत्व मना । हा तो उणेपणा तयास ॥ १०६ ॥
सारांश जैसा मनाचा ग्रह । साधूनिर्णयीं तैसाच आग्रह ॥
झाला स्वामीच्या मनाचा निग्रह । नको मज अनुग्रह साईचा ॥ १०७ ॥
उगाच आलों मी येथवर । स्वामीस थोर उपजला अनादर ।
तेथून परतावयाचा निर्धार । केला मग साचार तात्काळ ॥ १०८ ॥
लोकेषणेचा दुरभिमान । साधूस कशास पाहिजे मान ॥
याहून मज दुजें अनुमान । निशाण पाहून होईना ॥ १०९ ॥
निशाणें अपुला मोठेपणा । साधू हा आणिता निदर्शना ॥
हाचि संतत्वाशीं उणेपणा । काय दर्शना जाणें त्या ॥ ११० ॥
घेतलिया हें ऐसें दर्शन । एणें कैसें निवावे मन ॥
हें तों दंभध्वज प्रदर्शन । समाधान एणे ना ॥ १११ ॥
म्हणती जावें माघारा । आल्या वाटे अपुले घरा ॥
दिसेना हा विचार बरा । फजीत खरा झालों मी ॥ ११२ ॥
सहवासी मग म्हणती त्यांसीं । इतके दूर आलां कशासीं ॥
केवळ निशाणें चित्तवृत्तीसीं । खळबळ ऐसी कां झाली ॥ ११३ ॥
आतां आपण आलों जवळ । रथ पालखी घोडा सकळ ॥
सरंजाम हा पाहतां निखळ । किती मग तळमळ लागेल ॥ ११४ ॥

परिसूनि स्वामी अधीकचि बिघडे। जया नगारे पालख्या घोडे ॥
ऐसे साधू मिजासी बडे। त्यां काय थोडे देखिले ॥ ११५ ॥
ऐसे विचार येऊन अंतरा। सोमदेवजी निघती माघारा ॥
शिरडीचा विचार नाहीं बरा। रस्ता धरा कीं नदीचा ॥ ११६ ॥
मग बरोबरील वाटसरू। लागले तयास आग्रह करूं ॥
आलात आपण येथवरू। नका हो फिरूं माघारा ॥ ११७ ॥
आल्यासारिखे चला कीं पुढें। नका करूं हे तर्ककुडे ॥
हें निशाण जें मशीदी उडे। साधूकडे ना संबंध ॥ ११८ ॥
या साधूस नलगे निशाण। नलगे लोकेपणा नलगे मान ॥
ग्रामस्थास हें आवडे भूषण। भक्ति प्रमाण कारण या ॥ ११९ ॥
पाहूं नका कीं तुम्ही निशाण। जाऊनि घ्या नुसतें दर्शन ॥
राहूं नका तैं एक क्षण। जा कीं परतोन माघारा ॥ १२० ॥
इतक्यांत येतां शिरडीजवळ। वाटलें उपदेश ऐकून तो सरळ ॥
काढून टाकावी मनाची मळमळ। पुनश्च हळहळ नसावी ॥ १२१ ॥
असो श्रीसमर्थ दर्शनें करून। बुवा गेले विरघळून ॥
प्रेम आलें डोळां भरून। कंठ सद्गदून दाटला ॥ १२२ ॥
चित्त झालें सुप्रसन्न। नयन उल्हासे सुख संपन्न ॥
कधीं चरण रजस्नान। करीन ऐसें त्यां झालें ॥ १२३ ॥
पहातां रूप तें नेटक। मना नयना पडलें टक ॥
पाहतचि राहिले टकमक। मोहें अटक पाडिली ॥ १२४ ॥
कुतर्क मनींचे मनीं जिराले। चित्तदर्शनानंदीं विराले ॥
सगुणरूप नयनीं मुराले। बुवा झाले तल्लीन ॥ १२५ ॥
डोळां देखतां महानुभावा। परम आल्हाद सोप देवा ॥
आत्मयारामा जाहला विसावा। वाटे वसावा हा ठाव ॥ १२६ ॥

दर्शनेंच विकल्प मावळे । बुद्धी ठायींच ताटकळे ॥
दुजेपण समस्त निघळे । ऐक्य जाहले सबाह्य ॥ १२७ ॥
वाचेसि निःशब्दत्वें मौन । निमेषोन्मेष रहित नयन ॥
अंतर्बाह्य चैतन्यघन । समाधान समरसे ॥ १२८ ॥
निशाणदर्शनें आधीं मुरडले । पुढें प्रेमोद्रेकें निडारले ॥
सात्विक अष्टभावें उभडिलें । वेढिले प्रेमे बाबांचे ॥ १२९ ॥
जेथें मन पूर्ण रंगलें । तेंच अपुलें स्थान वहिले ॥
हे निजगुरूचे बोल आठवले । प्रेम दाटलें बुवांना ॥ १३० ॥
बुवा हळुहळू पुढे येती । तों तों महाराज रागास चढती ॥
शिव्यांची त्या लाखोली वाहती । तों तों त्यां प्रीति द्विगुणित ॥१३१॥
समर्थ बाबांची करणी अचाट । तयांचा तों विलक्षण घाट ॥
नारसिंहावताराचा थाट । आटोकाट आणिला ॥ १३२ ॥
थोतांड आमुचें अमुच्या पाशीं । राहो म्हणती चल जा घराशीं ॥
खबरदार माझ्या मशीदीशी । जर तूं येशील मागुता ॥ १३३ ॥
जो लावितो मशीदीस निशाण । कशास व्हावें त्याचें दर्शन ॥
हें काय संतांचें लक्षण । येथें न क्षण एक कंठावा ॥ १३४ ॥
असो पुढें साशंक चित्त । सभा मंडपीं स्वामी प्रवेशत ॥
दुरून पाहून साईची मूर्त । स्वामीसीं निवांत राहवेना ॥ १३५ ॥
हा अपुलेच विचारांचा प्रतिध्वनी । शब्दशः तो आदळतां कानीं ॥
बुवा शरमले स्थानिचे स्थानीं । अंतर्ज्ञानी महाराज ॥ १३६ ॥
किती हो आपण अप्रबुद्ध । किती महाराज तरी प्रबुद्ध ॥
किती त्या माझ्या कल्पनाविरुद्ध । किती हें शुद्ध अंतर ॥ १३७ ॥
साई कोणास देती आलिंगन । कोणास करिती हस्तस्पर्शन ॥
कोणास देती आश्वासन । कृपावलोकन कोणास ॥ १३८ ॥

कोणाकडे पाही हास्यवदन । कोणाच्या दुःखाचें करी सांत्वन ॥
कोणास उदी प्रसाददान । करीत समाधान सकळांचें ॥ १३९ ॥
ऐसें असतां मजवरीच क्रोध । वाटे हा मम वर्तनानुरोध ॥
क्रोधनाहीं हा मजला बोध । होईल मोददायीतो ॥ १४० ॥
असो पुढे तैसेंच झालें । स्वामी बाबापाशीं जे रमले ॥
साईकृपे निर्मळ बनले । चरणीं ठेले निरंतर ॥ १४१ ॥
साईभक्तिप्रभव वीर्य । विरवो दुर्वासना मात्सर्य ॥
उपजवो शांती श्री धैर्य । करो कृतकार्य निजभक्तां ॥ १४२ ॥
गंधर्व यक्ष सुरासुर । इहीं भरलें हें चराचर ॥
त्या अखिल विश्वीं हा विश्वंभर । जरी निरंतर भरलेला ॥ १४३ ॥
परी न स्वीकारितां आकार । ठाता सदैव निराकार ॥
आम्ही मानव हे साकार । होता न उपकार लवमात्र ॥ १४४ ॥
तात्पर्य धरोनि लीलाविग्रह । साई न करिते लोकसंग्रह ॥
अथवा दुष्टदुर्जनपतनिग्रह । कैंचा अनुग्रह भक्तांवर ॥ १४५ ॥
आला अध्याय संपावयाला । तों एक वृत्तांत मज आठवला ॥
साईसदुपदेशाचा मासला । मानील त्याला हितकारी ॥ १४६ ॥
वृत्तांत आहे अति लहान । स्मरण ठेवी तो कृतकल्याण ॥
म्हणून श्रोतयां करितों विनवण । क्षण अंतःकरण द्या मज ॥ १४७ ॥
एकदां भक्त म्हाळसापती । नानासाहेब यां समवेती ॥
बैसले असतां मशीदीप्रती । परिसा चमत्कृति घडली ती ॥१४८॥
समर्थसाई दर्शनोत्सुक । कोणी एक श्रीमान गृहस्थ ॥
वैजापूरनिवासी तेथ । परिवारान्वित पातले ॥ १४९ ॥
पाहूनिया स्त्रियांचा गोषा । नाना संकोचले निज मानसा ॥
स्वयें उठून द्यावें अवकाशा । वाटलें संतोषार्थ तयांच्या ॥ १५०

म्हणूनि नाना उठूं सरती । तंव बाबा तयां वारिती ॥
म्हणाले येणार येतील वरती । त्वां स्वस्थ चित्तीं बसावें ॥ १५१ ॥
तेही आलेती दर्शनार्थ । यावे कांहीं नाहीं हरकत ॥
ऐसें तयांस कोणी सुचवित । येवूनि वंदित साईस ॥ १५२ ॥
तया माजील एक नारी । वंदू जातां बुरखा सारी ॥
पाहूनि सौंदर्यें अति साजिरी । नाना निज अंतरीं मोहिले ॥ १५३॥
लोकांसमक्ष पाहण्या चोरी । पाहिल्याविण राहवेना अंतरीं ॥
वर्तावे काय कैसे परी । मोहाची उजरी नावरे ॥ १५४ ॥
बाबांची लज्जा मोठी अंतरीं । म्हणोनि मुख ते करवे न वरी ॥
दृष्टी जावूं लागली चांचरी । सांपडे कातरी तंव नाना ॥ १५५ ॥
ही तो नानांची अंतःस्थिती । सर्वांतर्यामी बाबा जाणती ॥
इतरां काय तियेची प्रतीती । ते तो झगटती शब्दार्था ॥ १५६ ॥
ऐसी नानांची वृत्ती बावरी । जाणूनि बाबा निजांतरी ॥
आणावया स्वस्थानीं माघारी । उपदेश जो करीत तो परिसा ॥ १५७ ॥
नाना किमर्थ गडबडसी मनीं । ज्याचा निजधर्म तो स्वस्थपणीं ॥
आचरतां आड यावे न कोणी । कांहीं न हानी तयांत ॥ १५८ ॥
ब्रह्मदेव सृष्टी रचितां । आपण तयाचें कौतुक न करितां ॥
व्यर्थ होऊं पाहील रसिकता । "बनतां बनतां बनेल" ॥ १५९ ॥
असतां पुढील द्वार उघडें । जावें कां मागील द्वाराकडे ॥
एक शुद्ध अंतर जिकडे । तेथें न सांकडे कांहीं ही ॥ १६० ॥
कुडा भाव नाहीं अंतरीं । तयास काय कोणाची चोरी ॥
दृष्टी दृष्टीचें कर्तव्य करी । भीड मग येथें धरिसी कां ॥ १६१ ॥
होते तेथें माधवराव । जात्या जयांचा चिकित्सक स्वभाव ॥
निज जिज्ञासा पूर्तिस्तव । पुसती त्यां भाव बोलाचा ॥ १६२ ॥

ऐसे माधवरावे पुसतां । नाना वदले थांब रे आतां ॥
सांगेन बाबांचिया मनोगता वाटेनें जातां वाडियातें ॥ १६३ ॥
संपतां क्षेमकुशल वार्ता । अभिवंदून साई समर्था ॥
नाना निजस्थानासि परततां । निघाले समवेता माधवराव ॥ १६४ ॥
ते नानांस पुसती तात्काळ । नाना "बनतां बनतां बनेल" ॥
आदीकरूनि बाबांचे बोल । स्पष्टार्थ वदाल काय त्यांचा ॥ १६५ ॥
अर्थ सांगावया होईना जीव । बहुत चालली उडवा उडव ॥
तेणे अधिकचि संशयसमुद्भव । होई न माधवमन स्वस्थ ॥ १६६ ॥
मग करूनिया हृदय उघडें । नानाहीं जें घडले तिकडे ॥
ते साग्र माधवरावांचिया होडे । कथूनि कोडे उलगडिलें ॥ १६७ ॥
काय बाबा किती दक्ष । जावो कोणाचें कोठेही लक्ष ॥
ते तो स्वयें अंतर्साक्ष । सर्व प्रत्यक्ष तयां तें ॥ १६८ ॥
असीही त्रोटक अभिनव वार्ता । परिसतां साश्चर्य होईल श्रोता ॥
पाहूं जातां येथील मथितार्था । स्थैर्य गंभीरता बहुमोल ॥ १६९ ॥
मन जातीचेच चंचळ । होऊं न द्यावें उच्छृंखळ ॥
होवो इंद्रियांची खळबळ । शरीर उतावीळ होऊं नये ॥ १७० ॥
इंद्रियांचा नाहीं विश्वास । विषयार्थ व्हावें न लालस ॥
हळूहळू करितां अभ्यास । चांचल्यनिरास होईल ॥ १७१ ॥
होऊं नव्हे इंद्रियाधीन । तींही न सर्वथा राहती दाबून ॥
विधिपूर्वक तयांचें नियमन । करावें पाहून प्रसंग ॥ १७२ ॥
रूप हा तो दृष्टीचा विषय । सौंदर्य वस्तूचें पहावें निर्भय ॥
तेथें लाजेचें कारण काय । द्यावा न ठाव दुर्बुद्धीतें ॥ १७३ ॥
मन करोनिया निर्वासन । ईशकृतीचें करा निरीक्षण ॥
होईल सहज इंद्रिय दमन । विषय सेवन विस्मरण ॥ १७४ ॥

रथ न्यावया इष्टस्थानीं । सारथी जैसा मूळकारणी ॥
तैसी ही बुद्धि हितकारिणी । दक्ष आकर्षणीं इंद्रियांच्या ॥ १७५ ॥
सारथी करी रथनियमन । बुद्धिही करूनि इंद्रियदमन ॥
आवरी शरीरस्वैरगमन । अनिवार चंचलपण मनाचे ॥ १७६ ॥
शरीर इंद्रिय मनोयुक्त । ऐसिया जीवाचे जे भोक्तृत्व ॥
ते संपताच वैष्णवपद प्राप्त । ऐसे हें सामर्थ्य बुद्धीचें ॥ १७७ ॥
चक्षुरादि इंद्रियनिचय । भिन्न भिन्न हयस्थानीय ॥
रूपरसादि जे जे विषय । मार्ग ते निरय प्रवर्तक ॥ १७८ ॥
यत्किंचित विषयाभिलाश । करी पारमार्थिक सुखा नाश ॥
म्हणोनि त्यागा तो निःशेष । तरीच तो मोक्ष तुजलाधे ॥ १७९ ॥
बाह्येंद्रियें जरी निवृत्त । असतां अंतःकरण आसक्त ॥
नाहीं जन्ममरणा अंत । विषय अत्यंत घातुक ॥ १८० ॥
लाधलिया विवेकी सारथी । विवेकें राखी लगाम हातीं ॥
इंद्रियवाजी कुमार्ग वर्ती । स्वप्नींही होती न लवमात्र ॥ १८१ ॥
ऐसा मनःसमाधानपर । निग्रही दक्ष कुशल चतुर ॥
भाग्यें लाधलिया सारथी चतुर । कैचें दूर विष्णुपद ॥ १८२ ॥
तेंच पद परब्रम्ह । वासुदेव अपर नाम ॥
तेंच सर्वोत्कृष्णपद परम । परंधाम परात्पर ॥ १८३ ॥
असो झाला हा अध्याय पुरा । याहून गोड पुढील दुसरा ॥
रिझवील सद्भक्तांच्या अंतरा । श्रवण करा क्रमानें ॥ १८४ ॥
असो शेवटीं जगच्चालक । सद्गुरू जो बुद्धिप्रेरक ॥
तयाचे चरणीं आभारपूर्वक । हेमाड मस्तक अर्पीतसे ॥ १८५ ॥
स्वस्ति श्रीसंतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्री साईसमर्थ सच्चरिते । संत परीक्षण मनोनिग्रहणं नाम
एकोन पंचाशत्तमोध्यायः संपूर्ण :

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ श्रीसाईलीला प्रसिद्ध झाल्याबरोबर वर्गणीदारांकडे रवाना होते. अपरिहार्य अडचणीमुळे विलंब न झाल्यास चालू वर्षांत प्रत्येक महिन्यास एक जोड अंक निघेल.

३ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

४ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

५ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

# लेखकांकरितां.

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावा. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करू.

संपादक—**श्रीसाईलीला**

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष ५ वें ] [ अंक ११-१२

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ।



क्षणमिह सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ।

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

६३०

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| महाराजांचे अनुभव ... ... ... ... | ६३१ (अ)–६५८ |
| स्फुट एकनाथी भागवतांतील वेंचे ... ... | ७७१–७७७ |
| ,, ह. भ. प. दासगणू महाराजांचीं पदें ... ... | ७७८–७९३ |
| ,, ज्ञानेश्वरींतील वेंचे ... ... ... | ७९४–७९६ |
| ,, भावार्थ रामायणांतील वेंचे ... ... ... | ७९६–८०६ |
| साईभावदीप—( श्री. नी. रा. सहस्रबुद्धे ) ... ... | ७६५–७८८ |
| परमार्थप्रपा—( श्री हेमांड ) ... ... ... | ११ अ–१४ |
| श्रीसाईसच्चरित—( श्री हेमाडपंत ) ... ... | ८३७–८५६ |


## श्री साईभक्तांस विज्ञप्ति

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साई लीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

रा. आ. तर्खड

—प्रकाशक

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरीनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास =॥-

## चुकीची दुरुस्ती.

स्फुट 'एकनाथी भागवतांतील वेंचे' या विषयांचीं पृष्ठें ६५९ ते ६६२ छापलीं गेलीं आहेत. ती ७७१ ते ७७४ अशीं समजावीं.

॥ स्फुट ॥ ॥ श्रीदत्त चिदीश साईजनन्यैनमः ॥

सप्रेम साष्टांग नमस्कार वि. वि. खालील मजकुरास व अनुभवास आपल्या विबुधमान्य श्री साईलीलेच्या एखादे अंकी स्थळ द्यावें अशी सविनय प्रार्थना आहे.

स्रग्धरावृत्तम् ।

साक्षान्नारायणो यः कलिमल दहनो भक्तचित्ताभिरामः ।
यस्यानंदावतारो ऽभवदव नितले शीरडी दिव्य भूमौ ।
आविष्कर्तुं परांतां सगुणवपुषि या निर्गुणैश्वर्य सत्ता ।
तस्मै श्रीशाय नित्यं त्रिभुवन गुरवे साइने मे प्रणामः ।

अर्थः—जो प्रत्यक्ष भगवान् परमात्मा, कलियुगांतील पातकांना जाळून टाकणारा, भक्तांच्या चित्ताला रंजविणारा, निर्गुण परब्रह्माच्या ठिकाणीं जे परमश्रेष्ठ ऐश्वर्य आहे व जी परमश्रेष्ठ सत्ता आहे ( कर्तुं अकर्तुं अन्यथा कर्तुं ) तीच सत्ता व तेच ऐश्वर्य ( त्यांनींच धारण केलेल्या ) सगुण मानव शरीरांतही आहे हें दर्शविण्याकरितां ज्याचा आनंददायक अवतार शिरडी गांवच्या दिव्य भूमींत झाला त्या त्रैलोक्यगुरु श्रीश साई राजाला माझा अखंड नमस्कार असो.

श्री साईलीलेच्या तृतीय वर्षाच्या नवमांकीं बाबांच्या चरित्र रत्नाकरासंबंधाने ज्या ७७ बाबींचें जें एक छोटेसें टिपण केले आहे, त्यापैकीं बाबांनीं श्री गोदावरी तटाकीं कां निवास केला या प्रथम बाबीच्या व बाबा हिंदु का मुसलमान या २८ व्या बाबीचें मागील दोन अंकात यथामति विवेचन केलें. आतां बाबा व बाबांची उदी या २३ व्या बाबीचें या अंकात विवेचन करण्याचे योजिलें आहे.

अनुष्टुप्वृत्तम् ।

पवित्रा, मंगला, पुण्या, किंचित्कृष्णा सिता शुचिः ।
संजाता या शुभा रक्षा । मशीदिज्वलिता नलात् ॥ १ ॥

गुरुणा साइनाथेन। स्वकरेण यथा मुदा।
चर्चितं विनतं भाले। भक्तानां स्वपदेऽमले ॥ २ ॥
आगतानां तु सर्वेषां। मशिद्यां दर्शनाय च।
सा प्रोक्ता साईदेवेन। उदीरिति कपर्दिना ॥ ३ ॥
उत्कार उच्यते चोर्ध्वं। इकारो गमनं स्मृतः।
ईकारोपि तथा ख्यातः। गगनं चोद्गमो बुधैः ॥ ४ ॥
उदयं करोति भाग्यस्य। भक्तानां साइसद्गुरोः।
इहलोके परमेच। सोदिवोदीति कीर्तिता ॥ ५ ॥
श्रीउदी भक्तजननी। भक्त चिंतामणि स्तथा।
मंदारःकामधुक् दिव्या। भक्तकल्याणकारिणी ॥ ६ ॥
चिंता क्लश हरा शुद्धा। भीतिसंकटनाशिनी।
यशोदा धनदा धन्या। दोष-संहारिणी तथा ॥ ७ ॥
दुःखघ्नी सुखदानित्यं। नातिक्ता ना विदाहिनी।
कट्वम्ललवणा नास्ति। सेवने मधुरा प्रिया ॥ ८ ॥
साक्षाद्दिव्यौषधिश्चात्र। जाढ्य रोगाध्र संहरा।
कृपया साइ नाथस्य। निर्मिताभक्त शर्मणे ॥ ९ ॥
तत्सेवनं चानु दिनं। श्रद्धाभक्ति समन्वितम्।
मोक्षदायि भवेत्सत्यं। विद्यते नात्र संशयः ॥ १० ॥

अर्थः—मशीदींतील पेटलेल्या अग्नीपासून जी पवित्र, मंगल, पुण्य, शुद्ध, पांढरी पण थोडी काळसर व शुभरक्षा ( राख ) तयार झालेली (असे ) व जी मशीदींत आपल्या दर्शनाकरिता आलेल्या व जे आपल्या पवित्र पायांवर मस्तक ठेवून वंदन करीत, त्या सर्व भक्तांच्या कपाळीं श्रीसद्गुरु साईनाथ आपल्या स्वहस्ताने प्रेमाने लावीत, त्याच रक्षेला शंकररूप बाबा उदी असे म्हणत. उत्कार

म्हणजे उच्च किंवा वर व इकार म्हणजे जाणें. ईकार म्हणजेही जाणें किंवा वर जाणे असे पंडित लोक म्हणतात. यावरून बाबांच्या भक्तांचा या लोकीं व परलोकीं भाग्योदय करणारी जी तिलाच उदि किंवा उदी असें म्हटले जाते. अशी जी उदी ती भक्तांची आई आहे भक्तांचा चिंतामणी आहे. भक्तांचा कल्पवृक्ष आहे. भक्तांची दिव्य कामधेनू आहे. ती भक्तांच कल्याण करणारी आहे. ती अतिशुद्ध शुद्ध आहे. " चिंता क्लेश हरण करणारी आहे." भीति, संकट दूर करणारी आहे. यश देणारी आहे. संपत्ति देणारी आहे. ती धन्य आहे. ती दोषांचा नाश करणारी आहे. दुःख घालविणारी आहे. निरंतर सुख देणारी आहे. ती तिखट नाहीं. शरीराचा दाह करणारी नाहीं. कडू नाहीं. आंबट नाहीं. खारट नाहीं. परंतु खाण्याला प्रिय व मधुर आहे.या मेदिनीतलावर ती एक साक्षात् दिव्य औषधीच आहे. आळस, बुद्धि-मांद्य, रोग, व पातक नाहींसे करणारी आहे. श्रीसद्गुरुसाई देवांनीं परम कारुण्यानें भक्त कल्याणाकरितांच ती निर्माण केली आहे. अनन्यश्रद्धेने व भक्तियुक्त अंतः-करणाने तिचें निरंतर सेवन केल्यास खात्रीनें ती मोक्ष देणारी होईल यात तिळ-प्राय संशय नाहीं.

सकृद्दर्शनीं उदी हा शब्द ऊद, या उर्दू, फारशी अगर अरेबिक शब्दां-पासून झाला असावा असें दिसतें व उदबत्ती हेंही सामासिक नाम त्याच भाषेतील आहे. पुष्कळ परकीय शब्द मराठींत जसेच्या तसेच आले आहेत. व पुष्कळांस मराठीचे प्रत्यय लागून ते मराठी बनले आहेत. संस्कृत भाषेंत उदास खालील प्रमाणे नांवें दिलीं आहेत.

**धूप, श्रीवास, वृक धूप, श्रीवेष्ट, सरलद्रव.**

अमरकोश, द्वि. कांड ब्रह्मवर्ग ६९३

वरील कोणत्याही नांवाचे उदी हे अपभ्रष्टरूप दिसत नाहीं. हिंदु व जैन मंदिरांतून, यवन मशिदींतून व पारशी लोकांच्या अग्यारींतून उद अगर धूप, उदबत्ती, अगरबत्ती व चंदनकाष्ठें जाळण्याचा सार्वत्रिक अनादिकालापासून प्रघात आहे व बाबांच्या मशिदींतही तसा प्रघात होता. परंतु बाबा कधीही धुपाटण्यांतील धुपापासून अगर उदबत्तीपासून झालेली रक्षा उदी म्हणून